आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२७ जानेवारी २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक मेळाव्याला आज प्रधानमंत्री संबोधित करणार
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २१ फॉरेन्सिक वाहनांचं लोकार्पण
- गुलेन बॅरी सिंड्रोम आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं पथक पुण्यात दाखल

**आणि**

- एकदिवसीय महिला क्रिकेटमधला सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार स्मृती मानधनाला जाहीर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक मेळाव्याला संबोधित करणार आहेत. दिल्लीत जनरल करिअप्पा परेड मैदानावर होणाऱ्या या मेळाव्याची यावर्षीची संकल्पना ‘युवा शक्ती - विकसित भारत’ अशी आहे. ८०० हून अधिक छात्रसैनिक त्यात सहभागी होणार असून, राष्ट्र उभारणीसाठी एनसीसीची वचनबद्धता दर्शवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतील. या कार्यक्रमात १८ मित्र देशातले १४४ छात्रसैनिक देखील सहभागी होणार आहेत. शिक्षण मंत्रालय आणि आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या मेरा युवा भारत योजनेचे साडेसहाशे स्वयंसेवक विशेष पाहुणे म्हणून कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि समृद्धीसाठी केंद्र सरकार हर तऱ्हेनं प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. ७६ व्या प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित शेतकऱ्यांशी ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकार आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत आहे, असं त्यांनी सांगितलं. 'शेतातून थेट ग्राहकांपर्यंत' या पद्धतीमुळे शेतकऱ्यांना दलालांच्या मध्यस्थीशिवाय आपला माल विकून उत्पन्न वाढवता येत आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समान नागरी कायदा लागू करणारं उत्तराखंड हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी आज डेहराडून इथं या कायद्यासंबंधीचे नियम आणि इतर माहिती देणाऱ्या पोर्टलचं उद्घाटन केलं. विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, आणि लिव्ह इन नातेसंबंधांसह अनेक बाबींमधे हा कायदा लागू झाला आहे.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पक्षाचे समन्वयक अरविंद केजरीवाल यांनी आज पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सत्तेत आल्यावर ५ वर्षात १५ आश्वासनं पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. त्यात महिलांना दरमहा २१०० रुपयांची आर्थिक मदत, रोजगार निर्मिती, वैद्यकीय उपचारांसाठी संजीवनी योजना आणि थकित पाणी बिल माफ करणं

यासारख्या घोषणांचा समावेश आहे. भाजपा आणि काँग्रेस दिल्लीतल्या नागरिकांना खोटी आश्वासनं देत असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान आम आदमी पक्षानं यापूर्वी दिलेली आश्वासनं पूर्ण न केल्यानं लोकांनी त्यांना आधीच नाकारलं असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसनं जाहीरनाम्यावर दिली आहे.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज २१ मोबाइल फॉरेन्सिक वाहनांचं लोकार्पण केलं. या वाहनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रीय पद्धतीनं पुरावे गोळा करण्याची आणि साठवण्याची व्यवस्था असल्याचं मुख्यमंत्र्यांनी लोकार्पण सोहळ्यानंतर बोलताना सांगितलं. सबळ पुरावे नसल्यानं किंवा पुराव्यांसोबत छेडछाड झाल्यामुळे गुन्हेगार सुटण्याचं प्रमाण या वाहनांमुळे कमी होईल, असं ते म्हणाले.

राज्यात अशी एकूण २५६ फॉरेन्सिक वाहनं तयार केली जाणार आहेत. भारतीय साक्ष कायद्यानुसार गुन्ह्यातल्या पुराव्यांसाठी शास्त्रीय पद्धतीनं साक्ष तसंच पुरावे गोळा करणं बंधनकारक आहे. या निकषांनुसार पुरावे जमा करण्यासाठी फॉरेन्सिक वाहनांचं लोकार्पण करणारं, महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.

**<><><><>**

गुलेन बॅरी सिंड्रोम या आजारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं पथक पुण्यात दाखल झालं आहे. या ७ सदस्यीय पथकात राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण संस्था, भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, तसंच राष्ट्रीय विषाणू संस्थेतल्या तज्ज्ञांचा

समावेश आहे. या आजाराची लागण झालेल्या रुग्णांची संख्या आता १०१ झाली आहे. त्यातले ८१ पुणे महापालिका क्षेत्रात, १४ पिंपरी चिंचवड भागात, तर ६ इतर जिल्ह्यांमधले आहेत. याप्रकरणी २५ हजारांहून अधिक घरांची पाहणी महापालिकेनं केली आहे.

**<><><><><>**

भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त फेब्रुवारी महिन्यात राज्यातल्या ६ हजारांहून अधिक महाविद्यालयांत "संविधान गौरव महोत्सवा" अंतर्गत विविध उपक्रमाचं आयोजित केले जाणार आहेत. उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली. या महोत्सवात तज्ज्ञांची व्याख्यानं, निबंध, वक्तृत्व, भित्तीपत्रक स्पर्धा, चर्चासत्रांच्या आयोजनासोबतच जनजागृती अभियानही चालवलं जाणार आहे. राज्यघटनेतल्या मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करणं आणि नागरिकांना त्यांचे घटनात्मक अधिकार आणि कर्तव्यांचं पालन करण्यासाठी प्रेरित करणं, हा या महोत्सवाचा उद्देश आहे.

**<><><><><>**

पुण्यातल्या महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन तसेच रहिवाशांचं इतर ठिकाणी पुनर्वसन करायला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. या कामांसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला असून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानं आता स्मारक विस्तारीकरणाला गती मिळणार आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेनं महिला एकदिवसीय क्रिकेट मधे सर्वोत्कृष्ट खेळाडूचा सन्मान भारताची सलामीची फलंदाज स्मृती मानधना हिला जाहीर केला आहे. गेल्या वर्षभरात तिनं १३ एकदिवसीय सामन्यांमधे मिळून ७४७ धावा करुन विक्रमाची नोंद केली. यात ४ शतकी खेळी होत्या. हा देखील महिला क्रिकेटमधला विक्रम आहे. तिच्या एकदिवसीय सामन्यांच्या कारकिर्दीतल्या २४ सामन्यांमधे मिळून तिने यंदा १ हजार ३५८ धावा पूर्ण केल्या.

<><><><><>

खेलो इंडियाच्या हिवाळी स्पर्धांच्या पहिल्या टप्प्याची आज सांगता होत आहे. भारतीय लष्कर आणि भारत-तिबेट सीमा पोलिस दलाच्या पुरुष संघांमधे आईस हॉकीमध्ये आज अंतिम सामना होणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राने दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य पदकं जिंकून, पदकतालिकेत अव्वल स्थान मिळवलं आहे.

<><><><><>

ऑसीटनी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्री आणि त्याचा क्रोएशियन जोडीदार इव्हान डोडिग यांचा सामना आज जर्मनीच्या मार्क वॉलनर आणि जेकब स्नायटर या जोडीशी होणार आहे. फ्रान्समधल्या माँटपेलियर इथं रात्री ८ वाजून ४० मिनिटांनी हा उपउपांत्यपूर्व फेरीचा सामना होईल. भारताच्या विजय सुंदर प्रशांत आणि जीवन नेदुंचेझियान या

भारतीय जोडीचा सामना उद्या जोनाथन आयसेरिक आणि फ्लॅव्हियो कोबोली या फ्रेंच इटालियन जोडीशी होईल.

<><><><><>

धाराशिव तालुक्यातील पळसप इथं दहावं मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलन येत्या २ फेब्रुवारी रोजी होणार आहे. शिक्षण महर्षी वसंतराव काळे प्रतिष्ठान, किसान वाचनालय पळसप आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतीने संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. संमलेनाचं उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या साहित्य संमेलनात संविधानाच अमृत महोत्सव आणि मानवी मूल्ये या विषयावर परिसंवाद होणार असून कथाकथन, कवी संमेलन होणार आहे.

<><><><><>

राज्याचे उद्योग मंत्री आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त उदय सामंत यांच्या हस्ते अहिल्यानगर इथल्या १००व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्यसंमेलनाचं काल उद्घाटन झालं. राज्यातल्या गड-किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्यगाथा लोककलांच्या माध्यमातून सादर करण्याबाबत लवकरच प्रयत्न करण्यात येईल, असं सामंत यावेळी म्हणाले. आमदार संग्राम जगताप, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त मोहन जोशी, अभिनेते मकरंद अनासपुरे, ९९व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

हिंगोली जिल्ह्यात काल रात्री झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये तीन जण ठार झाले. वसमत-मालेगाव मार्गावर कन्हेरगाव फाट्याजवळ दुचाकीचा अपघात होऊन दोन जण ठार झाले. दुचाकीवरील दोघेजण नांदेडहून परभणीकडे जात होते. अन्य एका अपघातात कळमनुरी तालुक्यात शेवाळा कालव्याच्या पुलावर नियंत्रण सुटल्यानं दुचाकीवरील तरुणाचा कालव्यात पडून मृत्यू झाला.

<><><><><>

आकाशवाणीच्या रत्नागिरी केंद्राचे सेवानिवृत्त निवेदक सुरेश भावे यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या देहदानाच्या इच्छेनुसार त्यांचं पार्थिव आज रत्नागिरीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आलं. १९७७ पासून २००६ पर्यंत ते आकाशवाणीच्या सेवेत होते. रंगभूमीवर त्यांचं योगदान होतं. तसंच कीर्तनकार म्हणूनही त्यांनी नावलौकिक प्राप्त केला होता.

<><><><><>

जागतिक कीर्तीचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. चेरियन यांचं काल बंगळुरू इथं निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. भारतात पहिली यशस्वी कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्ट शस्त्रक्रिया त्यांनी केली होती. मणिपालच्या कस्तुरबा गांधी विद्यालय, रुग्णालयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये हृदयशस्त्रक्रियेचे प्रशिक्षण घेतलं. राष्ट्रपतींचे मानद हृदयरोग शल्यचिकित्सक म्हणून त्यांची ओळख होती.

//<><><><><>//